# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

## ई वार्ता

**ऑक्टोबर २०२२**




मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २४९७/२०२२

मफुकृवि ई वार्ता
ऑक्टोबर २०२२

वर्ष :२, अंक क्रं. : २२, ऑक्टोबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे फुले तृप्ती व फुले कावेरी हे तुरीचे वाण राष्ट्रीय पातळीवर लागवडीसाठी अधिसूचित





**दि. २८ ऑक्टोबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कडधान्य सुधार प्रकल्पाने विकसीत केलेले तुरीचे फुले तृप्ती व फुले कावेरी हे वाण राष्ट्रीय पातळीवर लागवडीसाठी अधिसूचित करण्यात आले आहेत. नवी दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या केंद्रीय वाण प्रसार समितीच्या ८९ व्या बैठकीत हे वाण अधिसूचित करण्यात आले. महाराष्ट्रात खरीप हंगामातील तूर हे महत्वाचे पीक असून या पिकाखाली महाराष्ट्रातील १२.३६ लक्ष हेक्टर क्षेत्र असुन १२.५२ लक्ष टन उत्पादन मिळते तर उत्पादकता १०१३ किलो/प्रती हेक्टर आहे. तूर पिकामध्ये अधिक उत्पादनक्षम व लवकर पक्व होणारे आणि मर व वांझ रोगास प्रतिकारक्षम असणाऱ्या वाणांची निर्मितीच्या दृष्टीने सुरु असलेल्या संशोधनाचे हे दोन्ही वाण फलीत आहे. हे वाण नीम–गरवे (मध्यम कालावधी) प्रकारातील असून अधिक उत्पादनक्षम आहेत. फुले तृप्ती (पी.टी.१०–१) हा वाण देशाच्या मध्य विभागातील महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरात आणि छत्तीसगड या राज्यांसाठी खरीप हंगामात वेळेवर पेरणी आणि जिरायत/बागायत लागवडीसाठी प्रसारीत करण्यात आला आहे. या वाणापासून सरासरी प्रति हेक्टरी २२.६६ क्विंटल उत्पादन मिळते. हा वाण मर आणि वांझ रोगास मध्यम प्रतिकारक असुन शेंगा पोखरणारी अळी आणि शेंगमाशी या किडीचा कमी प्रार्दुभाव दिसून आला. फुले कावेरी (पी.टी.११–४) हा वाण देशाच्या दक्षिण विभागातील तामिळनाडु, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगाना आणि ओडीशा या राज्यांसाठी खरीप हंगामात वेळेवर पेरणी आणि जिरायत/बागायत लागवडीसाठी प्रसारीत करण्यात आला आहे. या वाणापासून सरासरी प्रति हेक्टरी १५.९१ क्विंटल उत्पादन मिळते. या वाणाचे फिकट तपकिरी रंगाचे अधिक टपोरे दाणे असून १०० दाण्यांचे वजन ११.५२ ग्रॅम आहे. हा वाण मर आणि वांझ रोगास मध्यम प्रतिकारक असून शेंगा पोखरणारी अळी आणि शेंगमाशी या किडीचा सुध्दा कमी प्रार्दुभाव दिसून आला. या वाणांच्या निर्मितीमध्ये पीक पैदासकार डॉ. एन.एस. कुटे, डॉ. व्हि.एम. कुलकर्णी, श्री. वाय. आर. पवार, रोगशास्त्रज्ञ डॉ. व्हि.ए. चव्हाण, किटकशास्त्रज्ञ डॉ. सी.बी. वायळ यांचे मोलाचे योगदान लाभले. याकरीता कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, तत्कालीन संशोधन संचालक डॉ. शरद गडाख तसेच विद्यमान संशोधन संचालक डॉ. सुनिल गोरंटीवार आणि आखिल भारतीय कडधान्य संशोधन संस्था, कानपुर येथील तुर संशोधन प्रकल्पाचे सन्मवयक डॉ. इंद्रप्रकाश सिंग यांची प्रेरणा आणि मार्गदर्शन लाभले.

वर्ष :२, अंक क्रं. : २२, ऑक्टोबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## राहुरी कृषि विद्यापीठात महत्त्वाच्या रिक्त पदांचा अधिकाऱ्यांना अतिरिक्त पदभार



**दि. १९ ऑक्टोबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी विद्यापीठातील अधिष्ठाता (कृषि), संशोधन व विस्तार शिक्षण संचालक पद, पदव्युत्तर महाविद्यालय व डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता या रिक्त पदांवर नेमणुका केल्या आहेत. यामध्ये डॉ. प्रमोद रसाळ यांची अधिष्ठाता (कृषि) या पदावर, कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुनील गोरंटीवार यांची संचालक, संशोधन या पदावर, पीक रोग शास्त्र व कृषि अणुजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. तानाजी नरुटे यांची संचालक, विस्तार शिक्षण या पदावर, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण यांची पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता या पदावर तर डॉ. दिलीप पवार यांची डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता या रिक्त पदांचा अतिरिक्त पदभार दिला आहे. विद्यापीठाचे कामकाज सुरळीतपणे चालण्यासाठी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील व कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे यांनी या नियुक्त्या केल्या आहेत.

## श्री. नरेंद्र पाटील व श्री. अभिजीत पाटील हे आहेत ऑक्टोबर महिन्याचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे आयडॉल्स




**दि. १ ऑक्टोबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी मफुकृवि आयडॉल्सची

संकल्पना मांडली आहे. त्या अनुषंगाने ऑक्टोबर महिन्यातील महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे शेतकरी आयडॉल म्हणुन श्री. नरेंद्र पाटील व कृषि उद्योजक म्हणुन श्री. अभिजीत पाटील यांची निवड झालेली आहे. श्री. नरेंद्र पाटील हे मु. लोणी पो. खर्डी, ता. चोपडा, जि. जळगांव येथील शेतकरी असून कृषि पदवीधर श्री. अभिजीत पाटील हे मु.पो. नांदरखेडा, ता. शहादा, जि. नंदुरबार येथील कृषि उद्योजक आहे. शेतकरी आयडॉल श्री. नरेंद्र पाटील यांनी विविध फळे व भाजीपाला पिकांचे विक्रमी उत्पादन घेतले असून विद्यापीठाच्या भुईमुग या पिकाची फुले भारती, हरभऱ्याची फुले विक्रम व तुरीची फुले राजेश्वरी या वाणांचे परिसरातील शेतकऱ्यांच्या मदतीने मोठ्या प्रमाणात बिजोत्पादन घेतलेले आहे. त्यांनी ठिबक सिंचन, तुषार सिंचन तसेच सेंद्रिय शेतीसाठी विविध निविष्ठांचा वापर आपल्या शेतात केलेला आहे. पॉली मल्चींग, नॉन ओवन फॅब्रीक क्रॉपकव्हर तंत्रज्ञानाच्या वापराबरोबरच सिंचनासाठी शेततळ्याचा वापर करीत आहेत. श्री. नरेंद्र पाटील यांनी चक्राकार पीक पध्दत विकसीत केली असून त्यांनी सुरु केलेल्या शेती अवजारे भाड्याने देणे या व्यवसायामुळे परिसरातील शेतकऱ्यांचा फायदा झालेला आहे. कृषि उद्योजक श्री. अभिजीत पाटील यांनी पुणे कृषि महाविद्यालयातून बी.एस्सी (कृषि) चे तसेच अमेरीकेतील आयओवा स्टेट युनिव्हरर्सिटीतून उद्यानविद्या विषयात एम.एस.चे शिक्षण घेतलेले आहे. त्यांनी आपल्या शेतीमध्ये सुधारीत तंत्रज्ञानाचा वापर करुन विविध पिके व फळांची लागवड केलेली आहे. त्यांनी सन २०१६ साली सुरु केलेल्या वनश्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनीच्या माध्यमातून वनश्री शेतीसेवा व सल्ला केंद्र, वनश्री माती व पाणी परिक्षण प्रयोगशाळा, गोदाम निर्मिती, वनश्री हायटेक नर्सरी, शेतकरी सहाय्यता केंद्र तसेच कापूस जिनींग, प्रेसिंग व ऑईलमिलची स्थापना केली आहे. कृषि पर्यटन केंद्र, मत्स्यशेती, बांबु रोपवाटीका, सेंद्रिय उत्पादन प्रकल्प व औषधी वनस्पती लागवड या विविध प्रकल्पांच्या माध्यमातून श्री. अभिजीत पाटील यांनी परिसरातील शेतकऱ्यांच्या विकासात भर घातली आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व कृषि महाविद्यालये, कृषि संशोधन केंद्रे, कृषि तंत्र विद्यालये यांच्या दर्शनीय क्षेत्रात ही आयडॉल्स् प्रदर्शीत करण्यात येत आहे.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ व मॅग्नेट यांच्यामध्ये कृषि तंत्रज्ञानासाठी सामंजस्य करार



**दि. ८ ऑक्टोबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व आशियाई बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र कृषि व्यवसाय साखळी प्रकल्प (मॅग्नेट प्रकल्प) यांच्यामध्ये विविध फळ पिके, भाजीपाला व फुले यांच्या सेंटर ऑफ एक्सचेंज संदर्भात सामंजस्य करारावर कृषि महाविद्यालय, पुणे येथे स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. महाराष्ट्र कृषि व्यवसाय साखळी प्रकल्प मॅग्नेट प्रकल्प अंतर्गत उद्यानविद्या पिकांमधील पुरवठा साखळीमध्ये येणाऱ्या अडचणी दूर करून शेतकरी उत्पादक कंपन्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे व अर्थसाह्य पुरविणे हा हेतू आहे. सदर हेतू साध्य करण्यासाठी अद्ययावत कृषि तंत्रज्ञान हे कृषि

विद्यापीठाकडून उद्यान विद्यापीठांमध्ये पुरवठा साखळीमध्ये प्राथमिक लागवड तंत्रज्ञानापासून ते काढणी पश्चात हाताळणी व कृषि प्रक्रिया उद्योगापर्यंत तांत्रिक मार्गदर्शन प्राप्त होणार आहे. कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यावेळी म्हणाले की कृषि विद्यापीठाकडे विविध पिकांमध्ये अद्ययावत संशोधन झाले असून या उपक्रमातून हे तंत्रज्ञान शेतकरी उत्पादक कंपन्यांना उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होईल. मॅग्नेट प्रकल्पाचे प्रकल्प संचालक श्री. दीपक शिंदे यावेळी म्हणाले की या सामंजस्य कराराअंतर्गत पेरू, डाळिंब, स्ट्रॉबेरी, सीताफळ, केळी, भेंडी, लाल मिरची, हिरवी मिरची व निशिगंध या पिकांचे सेंटर ऑफ एक्सलन्सची उभारणी करण्यात येणार आहे. या सामंजस्य करारावर कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील व श्री. दीपक शिंदे यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या कार्यक्रमासाठी पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासाळकर, गणेशखिंड येथील राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्पाचे संशोधन संचालक डॉ. विनय सुपे, राहुरी येथील अखिल भारतीय फळपिके संशोधन प्रकल्पाचे प्रभारी अधिकारी डॉ. सतीश जाधव, फळपिके संशोधन प्रकल्पाचे वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ. विकास भालेराव तसेच मॅग्नेटचे डॉ. अमोल यादव, श्री. संपत यादव, कु. अश्विनी दरेकर हे अधिकारी उपस्थित होते. सदर सामंजस्य करारासाठी उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. श्रीमंत रणपिसे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व इकोसर्ट, फ्रांससोबत सामंजस्य करार

**दि. ८ ऑक्टोबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे महाराष्ट्र शासनाने सन २०१८– १९ पासून १८.२० हेक्टर क्षेत्रावर सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र सुरू केले असून या प्रकल्पामध्ये विविध सेंद्रिय फळबागा, भाजीपाला, सेंद्रिय रस व गुळासाठी उसाचे नवीन वाणांचा प्रतिसाद, देशी वाणांचे दुर्गम भागातून संकलन व त्यांच्या सेंद्रिय शेतीसाठी प्रतिसाद, विविध सेंद्रिय खते व द्रावणांचे प्रयोग, उत्कृष्ट गांडूळ खत निर्मिती व कंपोस्ट खते तयार करण्यासाठी विविध द्रावणांचा वापर, जमीन सुपीकता व सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी हिरवळीच्या खतांचे प्रयोग तसेच सोयाबीन, तूर, कांदा, हरभरा व गहू यांचे सेंद्रिय बीज उत्पादन घेण्यात येत आहे.

सेंद्रिय प्रमाणिकरण या विषयावरील एक वर्ष कालावधीचा आंतरराष्ट्रीय पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू करण्याविषयी सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व सेंद्रिय शेती प्रमाणीकरणातील नामांकित इकोसर्ट, फ्रांस यांचेमध्ये सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारावर राहुरी कृषि विद्यापीठाच्यावतीने कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील तसेच इकोसर्ट कंपनीतर्फे श्रीमती. अग्निस पाक्वीन व इकोसर्टचे व्यवस्थापकीय संचालक श्री. अनिल जाधव यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या एकवर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी कृषि फलोत्पादन/ कृषि व विक्री /कृषि अभियांत्रिकी/ जैवतंत्रज्ञान/ अन्न तंत्रज्ञान/ दुग्ध तंत्रज्ञान/कृषि उद्योग व्यवस्थापन तसेच कृषि व कृषि आधारित पदवी व्यतिरिक्त विज्ञान शाखेतील पदवीधारक या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतील. या अभ्यासक्रमाचे माध्यम इंग्रजी असून हा अभ्यासक्रम नोव्हेंबर, २०२२ पासून मध्यवर्ती परिसर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे सुरू करण्यात येईल. या एक वर्ष निवासी अभ्यासक्रमात महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील शास्त्रज्ञ तसेच इकोसर्ट, फ्रांस येथील तज्ञ या विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम करतील. या आंतरराष्ट्रीय पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना देशभरातील विविध सेंद्रिय  प्रमाणीकरण संस्था / कंपनीची माहिती होईल तसेच २०२२ ते २०२३ पासून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सेंद्रिय प्रामाणिकरण संस्थेची निर्मिती केलेली आहे. यामध्ये युवकांना नोकरीची संधी उपलब्ध होईल. त्यातच केंद्र सरकार व राज्य सरकार सेंद्रिय / नैसर्गिक शेती यावर ठोस पावले उचलत आहे. या सामंजस्य करारावेळी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कृषिविद्या विभाग प्रमुख डॉ. आनंद सोळंके, कुलगुरूंचे विशेष कार्य अधिकारी तथा जलसिंचन व पाणी व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. महानंद माने, तंत्र अधिकारी डॉ. रवी आंधळे, कृषिविद्या

विभागाचे प्राध्यापक तथा एकात्मिक शेती पद्धती व सेंद्रिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. उल्हास सुर्वे उपस्थित होते.

## ड्रोनचा संरक्षीत शेतीसाठी वापर या विषयावर एक आठवड्याचा प्रशिक्षण वर्गाचे आयोजन






**दि. ११ ऑक्टोबर, २०२२.** या डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगात ड्रोनच्या वापराला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. शेतीमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. शेतीमध्ये ड्रोन तंत्रज्ञानाचा उपयोग करुन शेतीच्या निविष्ठांवर होणाऱ्या खर्चात व वेळेमध्ये बचत होणार आहे. ड्रोन तंत्रज्ञानामध्ये कृत्रिम बुध्दीमत्ताचा उपयोग करुन शेतीमध्ये उत्पादनाचे व उत्पन्नाचे नवे मापदंडे प्रस्तापीत होऊ शकतात. ड्रोन तंत्रज्ञानाने डिजिटल शेतीमध्ये नवे आयाम प्रस्तापीत होतील असे प्रतिपादन नवी दिल्लीच्या भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे उपमहासंचालक (शिक्षण) आणि राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्पाचे राष्ट्रीय संचालक डॉ. आर.सी. अग्रवाल यांनी केले. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचा राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ड्रोनचा संरक्षीत शेतीसाठी वापर या विषयावर एक आठवड्याचे प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले आहे. या प्रशिक्षणाचे उद्घाटन करतांना भा.कृ.अ.प.चे उपमहासंचालक (शिक्षण) आणि रा.कृ.उ.शि.प्र.चे राष्ट्रीय निदेशक डॉ. आर.सी. अग्रवाल ऑनलाईन बोलत होते. याप्रसंगी कास्ट प्रकल्पाचे आणि भा.कृ.अ.प.–रा.कृ.उ.शि.प्र.चे राष्ट्रीय समन्वयक डॉ. अनुराधा अग्रवाल ऑनलाईन उपस्थित होत्या. त्याचबरोबर विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक आणि कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार, कास्ट प्रकल्पाचे सह समन्वयक डॉ. मुकुंद शिंदे उपस्थित होते.

यावेळी डॉ. अग्रवाल म्हणाल्या शेतीमध्ये कृत्रिम बुध्दीमत्ता आणि ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर ही आता काळाची गरज आहे. ड्रोन तंत्रज्ञानाचा शेतीत वापर केल्याने शेतीमध्ये होणाऱ्या खर्चाची बचत होऊन उत्पन्न दुप्पट करण्यास मदत होईल. डॉ. रसाळ मार्गदर्शन करतांना म्हणाले कास्ट प्रकल्पाद्वारे अद्ययावत ड्रोन प्रयोगशाळा विद्यापीठात स्थापन करण्यात आली आहे. या ड्रोन प्रयोगशाळेमध्ये विविध प्रकारचे ३७ ड्रोन उपलब्ध आहे. या व्यतिरिक्त सहा प्रकारचे औषध फवारणीचे ड्रोन उपलब्ध आहेत. देशात प्रथमच ड्रोन पायलट प्रशिक्षण संस्था या कृषि विद्यापीठास मंजुर झाली आहे. या एक आठवड्याच्या प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थींना ड्रोनचे पायाभुत ज्ञान आणि ड्रोनचा शेतीमध्ये वापर यावर प्रशिक्षीत केले गेले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गोरंटीवार यांनी केले. कार्यक्रमाचे स्वागत या प्रशिक्षणाचे प्रमुख डॉ. सचिन नलावडे यांनी केले. कार्यक्रमाचे

आभार या प्रशिक्षणाचे सहसमन्वयक डॉ. मुकुंद शिंदे यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ. शुभांगी घाडगे यांनी केले. याप्रसंगी विविध विभागांचे विभाग प्रमुख, या प्रशिक्षण वर्गाचे सहसंचालक डॉ. एम.आर. पाटील, डॉ. सुनिल कदम आणि देशातील विविध राज्यातून २६ प्रशिक्षणार्थी, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. हे प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. गीरीषकुमार भणगे, डॉ. वैभव माळुंजकर, इंजि. निलकंठ मोरे, इंजि. मोहसीन तांबोळी यांनी सहकार्य केले.

## राहुरी कृषि विद्यापीठामध्ये जागतिक अन्न दिवस साजरा



**दि. १४ ऑक्टोबर, २०२२.** आपण जे अन्न खातो हे परिपुर्ण असले पाहिजे. आपल्या आहारात फळे व भाजीपाल्याचे प्रमाण हे जास्त असायला हवे व चरबीयुक्त पदार्थ, तेल, साखर व मीठ याचे प्रमाण हे नगण्य असले तरच तो आहार हा परिपुर्ण मानला जाईल. सर्वांना पुरेसे पोषणतत्व असलेले शाश्वत व सुरक्षीत अन्न उपलब्ध होणे ही आजची गरज असल्याचे प्रतिपादन नाशिक येथील अन्न व औषध प्रशासनातील अन्न सुरक्षा अधिकारी डॉ. योगेश देशमुख यांनी केले. जागतिक बँक अर्थसहाय्यित, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प, नवी दिल्ली अंतर्गत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे असलेल्या हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र व अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक अन्न दिवसानिमित्त दैनंदिन जीवनातील अन्न व पोषणाची भूमिका या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. यावेळी व्याख्याते डॉ. योगेश देशमुख मार्गदर्शन करतांना बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण, कास्ट प्रकल्पाचे सहसमन्वयक डॉ. मुकुंद शिंदे उपस्थित होते.

डॉ. देशमुख आपल्या मार्गदर्शनात पुढे म्हणाले की जगामध्ये भुकेची समस्या फार मोठी असून १६ ऑक्टोबर, १९४५ रोजी स्थापन झालेल्या अन्न कृषि संस्थेच्या कार्यामुळे संपूर्ण जगात भुकेच्या समस्येवर प्रयत्न केले जात आहे. १६ ऑक्टोबरला साजऱ्या होणाऱ्या जागतीक अन्न दिवसाची यावर्षीची थीम आहे अन्नासाठी कोणीही पाठीमागे राहु नये. या अंतर्गत सन २०३० पर्यंत पुरेसे व पौष्टीक अन्न सर्वांना मिळावे यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यावेळी झालेल्या कार्यक्रमात अन्नदुतांना टी शर्टचे वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. रसाळ व डॉ. पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संयोजक म्हणून कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक तथा कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुनील गोरंटीवार यांनी तर सहसंयोजक म्हणून कास्ट प्रकल्पाचे सहसंशोधक डॉ. मुकुंद शिंदे यांनी काम पाहिले.या कार्यक्रमाचे आयोजन

सचिव म्हणून अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण यांनी तर सहआयोजन सचिव कृषि विद्या विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. उल्हास सुर्वे यांनी काम पाहिले. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. मुकुंद शिंदे यांनी करून दिली. या कार्यक्रमाचा उद्देश डॉ. उत्तम चव्हाण यांनी विषद केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शुभांगी घाडगे यांनी तर आभार डॉ. उल्हास सुर्वे यांनी मानले.डॉ. शुभांगी घाडगे, डॉ. वैभव मालुंजकर व इंजि.मोहसीन तांबोळी यांनी या कार्यक्रमाचे सह समन्वयक म्हणून काम पाहिले.

## राहुरी कृषि विद्यापीठात पी.एम. किसान सम्मान संमेलन कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण



**दि. १७ ऑक्टोबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील पदव्युत्तर महाविद्यालयाच्या डिजीटल क्लासरुममध्ये नवी दिल्ली येथील भारतीय कृषि संशोधन संस्थेच्या प्रंगणात झालेल्या पी.एम. किसान सम्मान संमेलन कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. यावेळी सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. श्रीमंत रणपिसे, कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार, अवजारे प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. तुळशीदास बास्टेवाड, प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. पंडित खर्डे, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. दत्तात्रय पाचारणे उपस्थित होते. यावेळी नवी दिल्ली येथे दि. १७ व १८ ऑक्टोबर, २०२२ या दोन दिवसीय किसान सम्मान संमेलनाचे उद्घाटन प्रधानमंत्री मा. श्री. नरेंद्र मोदी यांचे शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्री श्री. नरेंद्रसिंह तोमर, पर्यावरण व रसायन खते केंद्रीय मंत्री श्री. मनसुख मालविय व केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण राज्यमंत्री श्री. कैलाश चौधरी उपस्थित होते. यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते पी.एम. किसान सम्मान निधीचा बाराव्या हप्त्याचे शेतकऱ्यांच्या खात्यावर वितरण, देशभरातील ६०० किसान समृध्दी केंद्रांचे उद्घाटन, एक देश एक खत या योजनेचे तसेच कृषि स्टार्टअप प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी केलेल्या उद्घाटनपर भाषणात श्री. नरेंद्र मोदी म्हणाले की कृषि क्षेत्रात नव्यानेच सुरु झालेल्या स्टार्टअपच्या माध्यमातून देशाला तसेच कृषि क्षेत्राला समृध्द बनवायचे आहे. शेतामधील पिकांच्या लागणीपासून शेतमाल काढणी तसेच विक्री करण्यापर्यंत सर्व कामात हे स्टार्टअप शेतकऱ्यांना फायदेशीर ठरणार आहेत. देशभरातील तीन लाखापेक्षा जास्त शेतीसंबंधी साहित्य विकणाऱ्या दुकानांचे पी.एम. किसान समृध्दी केंद्रात परिवर्तन होणार आहे. या केंद्रामध्ये एकाच छताखाली शेतकऱ्यांना लागणाऱ्या सर्व निविष्ठा उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर संपूर्ण देशात भारत ब्रँड खतांची विक्री होणार आहे. कृषि क्षेत्रातील स्टार्टअपमुळे शेतकऱ्यांचे जीवन सोपे होणार आहे. अशा प्रकारे शेतीमध्ये देशाने आत्मनिर्भर बनण्याचा संकल्प केला असल्याचे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील शास्त्रज्ञ, विद्यार्थी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी केले.

मफुकृवि ई वार्ता
ऑक्टोबर २०२२
वर्ष :२, अंक क्रं. : २२, ऑक्टोबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## स्मार्ट बायोगॅस संयंत्र बनवणार स्मार्ट देशी गोपालन





**दि. १८ ऑक्टोबर, २०२२.** बायोगॅस प्लांट हे शेणावर प्रक्रिया करण्यासाठी सर्वात आशादायक अक्षय तंत्रज्ञानांपैकी एक आहे. विकेंद्रित बायोगॅस तंत्रज्ञान कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबवण्यात भारत निश्चितपणे अग्रेसर आहे. ग्रामीण भागात बायोगॅस तंत्रज्ञानाचा वापर करण्यामध्ये अनेक आर्थिक आणि तांत्रिक अडथळे आहेत. कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना सर्वात महत्त्वाचा तांत्रिक अडथळा म्हणजे बायोगॅस उत्पादनाच्या कामगिरीवर लक्ष ठेवण्यासाठी ट्रॅकिंग यंत्रणेचा अभाव. अनेक बायोगॅस संयंत्रे आहेत जी बसविल्यानंतर निकामी होतात. डिजिटल मॉनिटरिंग यंत्रणा सर्व प्लॅन्टचा मागोवा ठेवण्यास आणि सुधारात्मक कृती करण्यास नक्कीच मदत करेल असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र, पशुसंवर्धन व दूधशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, पुणे येथे स्मार्ट डिजिटल बायोगॅस मीटर बसविण्यात आले आहे. हे मीटर दर १ तासाने बायोगॅस उत्पादनावर लक्ष ठेवण्यास मदत करते तसेच डायजेस्टर प्रेशरची माहिती देखील देते. यासाठी एक स्वतंत्र लॉगिग आयडी तयार केला आहे आणि आपण कोणत्याही संगणकावरून सर्व माहिती मिळवू शकतो. बायोगॅस प्लांटचे डिजिटल मॉनिटरिंग बायोगॅस उत्पादनाचा मागोवा ठेवण्यास आणि कोणत्याही समस्येच्या बाबतीत सुधारात्मक कारवाई करण्यास मदत होणार आहे.

स्मार्ट बायोगॅस मीटरमुळे जगातील कोठूनही विविध प्लांटच्या बायोगॅस उत्पादनावर लक्ष ठेवण्यास मदत होईल. स्मार्ट बायोगॅस सयंत्राच्या वापरामुळे एक किलो शेणापासून किती बायोगॅस तयार होतो तसेच उत्पादित झालेल्या मिथेन उत्सर्जनाच्या नोंदणीमुळे कार्बन क्रेडिट मिळवण्यासाठी सुद्धा याचा भविष्यात वापर करण्यास सोपे जाणार आहे. सध्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रामध्ये दुधासाठी प्रसिद्ध असलेल्या देशी गाईंचे संवर्धन भ्रूण प्रत्यारोपण या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून चालू आहे तसेच शाश्वत देशी गोपालन होण्यासाठी शेण व गोमूत्रावरती प्रक्रिया करून त्याचा उपयोग पर्यावरण पूरक विविध वस्तू जसे मूर्ती, कुंड्या, पणत्या, लाकूड तसेच नैसर्गिक सेंद्रिय शेतीसाठी गांडूळखत, फॉस्फरस युक्त सेंद्रिय खत, विविध जिवाणूयुक्त बायोस्लरी इत्यादी गोष्टींचा अंतर्भाव केल्यास नक्कीच देशी गोपालन व्यवसाय फायदेशीर होणार आहे असे प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी नमूद केले. सदर प्रकल्पाचे किसान गॅस, पुणे या स्टार्टअप कंपनी बरोबर काम चालू असून त्यांना केंद्र सरकारने या कामासाठी विशिष्ट पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. हा प्रकल्प यशस्वी होण्यासाठी सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासाळकर, पशुसंवर्धन विभागाचे तांत्रिक प्रमुख डॉ. धीरज कंखरे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. प्रमोद साखरे व डॉ. सुनील अडांगळे प्रयत्न करत आहेत.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ
अन्नं बहु कुर्वीत तद् व्रतम्

# मफुकृवि ई वार्ता

ऑक्टोबर २०२२

वर्ष :२, अंक क्रं. : २२, ऑक्टोबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## देशी गो संवर्धनासाठी भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या दारात



**दि. १९ ऑक्टोबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीच्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र, पुणे अंतर्गत खंडाबे, ता. राहुरी येथील पशुपालक श्री. सुरसिंग पवार यांच्या गोठयातील संकरित कालवडीमध्ये सहिवाल जातीच्या देशी गाईचे भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञान उपक्रमाचा शुभारंभ राहुरी कृषि विद्यापीठाचे कुलगुरु यांचे विशेष कार्य आधिकारी डॉ. महानंद माने यांच्या हस्ते झाला. या तंत्रज्ञानाबद्दल डॉ. महानंद माने म्हणाले, सध्या देशातील शुध्द देशी गोवंशाची असलेली घटती संख्या पाहता जलदगतीने उच्च उत्पादन क्षमता असणाऱ्या गाईची संख्या वाढवण्यासाठी भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत गरजेचे आहे. या तंत्रज्ञानाचा प्रसार शेतकऱ्यांच्या दारात होणे आवश्यक आहे. याची सुरूवात झाल्याबद्दल सर्व शास्त्रज्ञ अभिनंदनास पात्र असून भविष्यात उच्च दर्जाच्या देशी गायी तयार करण्यासाठी भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाशिवाय पर्याय नाही. देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर व शेतकऱ्यांच्या गोठयात भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाचा वापर करण्यास सुरूवात केली आहे. या तंत्रज्ञानाच्या वापराने विद्यापीठाच्या विविध प्रक्षेत्रावर चार गीर व दोन सहिवाल कालवडीचा जन्म संकरित गाईच्या माध्यामातुन झाला आहे. या प्रकल्पातर्गत सुमारे १५० सहिवाल, गीर, थारपारकर, राठी, व लाल सिंधी या उच्च वंशावळीच्या देशी जातीच्या कालवडी निर्माण करण्याचा मानस आहे अशी माहिती भ्रूण प्रत्यारोपण समन्वयक डॉ. विष्णू नरवडे यांनी दिली. हे तंत्रज्ञान महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व एनडीडीबी यांच्या सहकार्याने राबविण्यात येत असून उच्च वंशावळीचा देशी गोवंश व त्यांची संख्या वाढविण्यासाठी मोठी मदत होणार आहे असे पशुसवंर्धन विभागाचे विभाग प्रमुख डॉ. दिनकर कांबळे यांनी नमुद करून प्रकल्पातील शास्त्रज्ञांना शुभेच्छा देऊन समाधान व्यक्त केले.

## कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी अनुकंपा तत्त्वावरील कर्मचाऱ्यांना दिली दिवाळीची भेट

**दि. २३ ऑक्टोबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या प्रयत्नाने विद्यापीठ प्रशासनाने मयत कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसास अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त्यांचे आदेश नुकतेच निर्गमित केले आहेत. यामध्ये लिपिक, प्रयोगशाळा परिचर, मजूर व शिपाई या प्रवर्गांचा समावेश असून एकूण १८ जणांना विद्यापीठ सेवेत सामावून घेण्यात आले आहे. शासकीय नियमानुसार एखादा कर्मचारी कर्तव्यावर असताना जर मयत झाला तर त्याच्या कायदेशीर वारसास अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याचा नियम आहे, त्यानुसारच संबंधित कर्मचाऱ्यांच्या वारसास नियुक्ती दिल्याची माहिती विद्यापीठाचे कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे यांनी दिली. ऐन दिवाळीच्या दिवसांमध्ये सदर नियुक्तीचे आदेश दिल्यामुळे या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबामध्ये दिवाळीच्या सणाचा आनंद द्विगुणित झाला असल्याचे मत संबंधित कर्मचाऱ्यांनी व्यक्त केले.

मफुकृवि ई वार्ता
ऑक्टोबर २०२२



## पुणे कृषि महाविद्यालयात मृदानुबंध : २०२२ – मृदवाणी प्रदर्शन व कृषि तंत्रज्ञानाच्या प्रभावी व व्यापक प्रचार–प्रसारासाठी भ्रमणध्वनीद्वारे माहितीपट निर्मिती कार्यशाळा संपन्न




**दि. १२ ऑक्टोबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, पुणे, राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टिलायझर्स लि., पुणे आणि उर्जा ॲग्रो फर्टीलायझर्स प्रा. लि., पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने माती, पाणी, वनस्पती व खते परीक्षण कार्यानुभव शिक्षण कार्यक्रम अंतर्गत मृदानुबंध : २०२२–मृदवाणी प्रदर्शन व कृषि तंत्रज्ञानाच्या प्रभावी व व्यापक प्रचार–प्रसारासाठी भ्रमणध्वनीद्वारे माहितीपट निर्मिती कार्यशाळा या दोन उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सदरील प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे शुभहस्ते, महाराष्ट्र राज्य साखर आयुक्त श्री. शेखर गायकवाड, वेस्ट इंडीया शुगर मिल्स् असोसीएशन (विस्मा), पुणे, कार्यकारी संचालक श्री. अजित चौगुले, राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टिलायझर्स लि., पुणे, उपमहासंचालक श्री. मधुकर पाचारणे, उर्जा ॲग्रो फर्टीलायझर्स प्रा. लि., पुण`मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विजय घोडेकर व कृषि महाविद्यालय, पुणेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनिल मासळकर यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी मान्यवरांचे हस्ते भूमातेला जलाभिषेक, सेंद्रिय खते, रासायनिक खते, जिवाणू खते, सेंद्रिय पदार्थ, शुद्ध बियाणे, मृदाआरोग्य पत्रिका, विक्रमी पीक उत्पादन संहिता अर्पित करुन दिपप्रज्वलनाने भूमाता पूजन संपन्न झाले. मृदवाणी प्रदर्शनामध्ये माती व पाणी परिक्षणाचे पीक उत्पादन वाढीबरोबर जमीन आरोग्यासाठी व राष्ट्रीय विकासासाठीचे महत्त्व अधोरेखित करण्याकरीता तसेच शेतकऱ्यांना माती व पाणी परीक्षणासाठी प्रवृत्त करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेतून साकारलेली घोषवाक्ये व भित्तीप्रत्रके प्रदर्शित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ. मासळकर यांनी केले. तद्नंतर कु. अंकिता लोखंडे या विद्यार्थिनीने तयार केलेला माती परीक्षणाचे महत्त्व सांगणारा माहितीपट, विद्यापीठ गीत व महाविद्यालयाच्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राने तयार केलेले माहितीपट प्रदर्शित करण्यात आले. तसेच कु. ऋषिकेश उगले, कु. सौरभ बिनवडे, कु. शंतनु सांबरे आणि कु. श्रीराज कोलते या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या माती वाचवा बोधचिन्हाचे लोकार्पण आणि मृदवाणी प्रदर्शनातील घोषवाक्ये व भित्तीपत्रके स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्राचे वितरण कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. कार्यशाळेच्या शेवटी डॉ. अभय पाटील यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

## पाडेगाव येथे ऊस बेणे विक्रीचा शुभारंभ



**दि. ७ ऑक्टोबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगावच्या मुलभूत ऊस बियाणे विक्रीचा शुभारंभ करण्यात आला. सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि., सोमेश्वरनगरचे चेअरमन श्री. पुरूषोत्तम जगताप यांचे हस्ते सांगली जिल्हयातील कसबे डिग्रज गावचे प्रगतशील शेतकरी श्री. राहुल भोकरे यांना ऊस बेणेमळयाची पहिली मोळी देवून बियाणे विक्री व वाटपाला सुरूवात केली. यावर्षी पाडेगाव संशोधन केंद्राने २५ हेक्टर क्षेत्रावर ऊसाच्या बियाणे मळे तयार केले आहेत. यामुळे ऊसाच्या मुलभूत बियाण्यापासून कारखान्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात पायाभूत बेणे मळे तयार करून शेतकऱ्यांना पुरवठा करता येईल. यामध्ये प्रामुख्याने को ८६०३२, फुले २६५, फुले १०००१, फुले ०९०५७, को ११०१५, फुले ११०८२ या वाणांचे बियाणे उपलब्ध होणार आहे. ऑक्टोबर महिन्यामध्ये को ८६०३२ आणि फुले २६५ या वाणाचे बियाणे मिळेल. डिसेंबर महिन्यात उरलेल्या वाणांचे बियाणे मिळेल. सर्व साखर कारखाने आणि शेतकऱ्यांनी पाडेगाव ऊस संशोधन केंद्राचे बियाणे वापरण्याचे आवाहन डॉ. भरत रासकर, ऊस विशेषज्ञ, ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव यांनी केले आहे. पाडेगाव ऊस संशोधन केंद्र शेतकरी आणि साखर कारखाने यांच्या प्रगतीकरीता सतत प्रयत्नशील आहे. या संशोधन केंद्राने प्रसारीत केलेल्या ऊस वाणांच्या बेण्याचा सर्व साखर कारखान्यांनी नवीन लागवडीसाठी उपयोग करावा असे आवाहन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी केले आहे.

## शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत रब्बी ज्वारी उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षण वर्ग संपन्न





**दि. ४ ऑक्टोबर, २०२२.** माल पिकतो तो विकला पाहिजे यासाठी तंत्रज्ञान गरजेचं आहे. ज्वारीमध्ये मुल्यवर्धन खुप गरजेचं आहे. ज्वारीवर प्रक्रिया करून ज्वारीची किंमत जास्त पटीने मिळते. ज्वारीमध्ये असणाऱ्या विविध घटकांमुळे विविध आजारांपासून सूटका होते. अन्न हे औषध म्हणुन खावे औषध अन्न म्हणुन खाऊ नये. ज्वारी मुल्यवर्धनातुन शेतकऱ्यांची उन्नती शक्य असे प्रतिपादन अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण यांनी केले. आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष–२०२३ या अंतर्गत भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्लीच्या शेतकरी प्रथम प्रकल्प व ज्वारी सुधार प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने रब्बी ज्वारी उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन ज्वारी सुधार प्रकल्प, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी या ठिकाणी करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानावरुन डॉ. उत्तम चव्हाण बोलत होते. यावेळी शेतकरी प्रथम प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक व प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. पंडित खर्डे, वरिष्ठ ज्वारी पैदासकार डॉ. दीपक दुधाडे, कीटकशास्त्रज्ञ डॉ. उत्तम कदम, प्रा. सुदाम निर्मळ, डॉ. उदयकुमार दळवी, डॉ. जे.एम. पाटील, प्रकल्पाचे सहसमन्वयक डॉ. सचिन सदाफळ, डॉ. भगवान देशमुख, तांभेरे, कानडगाव, चिंचविहिरे व कनगर गावातील ज्वारी उत्पादक शेतकरी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक डॉ. पंडित खर्डे यांनी केले. डॉ. दीपक दुधाडे यांनी कोरडवाहू रब्बी ज्वारीचे तंत्रज्ञान याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. उत्तम कदम यांनी ज्वारीवरील विविध किडींविषयी तर डॉ. उदयकुमार दळवी यांनी आरोग्याच्या दृष्टीने ज्वारीचे महत्त्व समजावून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख व आभार प्रदर्शन डॉ. सचिन सदाफळ यांनी केले. कार्यक्रमासाठी चिंचविहिरे, कनगर, तांभेरे व कानडगाव येथून पन्नासपेक्षा जास्त शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री विजय शेडगे, श्री किरण मगर व श्री राहुल कोऱ्हाळे यांनी परिश्रम घेतले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात स्वच्छ भारत अभियान कार्यक्रम संपन्न



**दि. १४ ऑक्टोबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे राष्ट्रीय सेवा योजना संचालनालय व कृषि जैव तंत्रज्ञान महाविद्यालय, लोणी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छ परिसर हरित परिसर कार्यक्रम प्रशासकीय इमारतीसमोर राबविण्यात आला. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, महाराष्ट्र व गोवा विभागीय कार्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय संचालक श्री. डी. कार्तीकेयन व महाराष्ट्र राज्याचे राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी डॉ. प्रशांतकुमार वनंजे, विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. महाविरसिंग चौहान, मुंबई मंत्रालयातील लेखाधिकारी श्री. खैरनार व लोणी येथील कृषि जैव तंत्रज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रविण गायकर उपस्थित होते. यावेळी श्री. कार्तीकेयन म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या

परिसरातील एकदा वापरुन टाकलेला प्लॅस्टिक कचरा गोळा करावा. प्रत्येकाने दररोज कमीत कमी दोन किलो प्लॅस्टिक कचरा गोळा केला तर प्लॅस्टिकच्या कचऱ्यापासून मुक्ती मिळून परिसर स्वच्छ होण्यास मदत होईल. डॉ. रसाळ यावेळी म्हणाले की आपले मन स्वच्छ ठेवण्यासाठी आपण जसा प्रयत्न करतो तसाच प्रयत्न परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांनी करायला हवा. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. चौहान यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या या स्वच्छ भारत अभियानाचा उद्देश स्पष्ट करुन हे अभियान ३१ ऑक्टोबरपर्यंत सुरु असणार असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विद्यापीठाचे क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड यांनी केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी परिसराची साफसफाई केली. यावेळी माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. हरी मोरे, डॉ. कैलास कांबळे, डॉ. पंडित खर्डे उपस्थित होते.

## राहुरी कृषि विद्यापीठात माजी विद्यार्थी संघटनांचे संमेलन, परिसंवाद व प्रदर्शनाचे आयोजन

**दि. २० ऑक्टोबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे संकल्पनेतुन महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे दि. १६ ते १८ डिसेंबर, २०२२ या कालावधीत महात्मा फुले कृषि विद्यापीठ व विद्यापीठाच्या संलग्न कृषि महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघटनांच्या संयुक्त विद्यमाने संमेलन, परिसंवाद व प्रदर्शन आयोजीत करण्यात येणार आहे. याप्रसंगी माजी विद्यार्थ्यांचा परिसंवाद व कृषि संबंधीत भव्य कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठातून पदवी घेतलेल्या व स्वतःचा उद्योग सुरु केलेल्या उद्योजकांनी या प्रदर्शनासाठी नावनोंदणी करावी. या परिसंवादामध्ये विविध कृषि उद्योजकांच्या यशोगाथांचा अनुभव घेता येणार आहे. या परिसंवाद व प्रदर्शनातून कृषिच्या विद्यार्थ्यांना कृषि उद्योगातील नवनविन संकल्पना बघता येणार आहेत. तसेच यशस्वी कृषि पदवीधर उद्योजकांबरोबर संवाद साधता येणार आहे. प्रदर्शनामध्ये एकाच दालनात कृषि निविष्ठा, कृषिमधील नविन संशोधन, कृषितील आधुनिक अवजारे, ड्रोन तंत्रज्ञान, रोपवाटीका तंत्रज्ञान इ. नविन तंत्रज्ञान शेतकऱ्यांना व विद्यार्थ्यांना बघण्यास मिळणार आहे. या निमित्ताने कृषि पदवीधर कृषि उद्योजक यांना त्यांनी केलेले यशस्वी प्रयोग दाखविण्यासाठी कृषि विद्यापीठाचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. तरी या माजी विद्यार्थी संघटनेच्या संमेलन व प्रदर्शनासाठी जास्तीत जास्त कृषि पदवीधर उद्योजकांनी आपली नोंदणी करावी असे आवाहन अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी केले आहे.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे पीएम किसान सन्मान संमेलनानिमित्त शेतकरी मेळाव्याचे आयोजन




**दि. १७ ऑक्टोबर, २०२२.** पीएम किसान सन्मान संमेलनानिमित्त ग्रो स्टार्टअप कोन्क्लेव आणि शेतकरी मेळाव्याचे आयोजन कृषि विज्ञान केंद्र, धुळे तर्फे कृषि महाविद्यालय, धुळे येथील सभागृहात करण्यात आले होते. या मेळाव्या दरम्यान

नवी दिल्ली येथून प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांचे हस्ते पी. एम. किसान सन्मान निधी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ऑनलाईन वितरीत करण्यात आला. सभागृहातील सदर कार्यक्रमात धुळे जिल्ह्यातील बहुसंख्येने शेतकरी आणि महिला बचत गट सदस्या उपस्थित होत्या. मा. पंतप्रधान यांचे शुभहस्ते पी. एम. किसान सन्मान निधीच्या वितरणासोबतच ६०० किसान समृद्धी केंद्राचे उद्घाटन या दिवशी करण्यात आले. तसेच एक देश एक उर्वरक योजनेची सुरुवात ही या निमित्ताने करण्यात आली. कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे यांनी सदरील मेळाव्याच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष कृषि महाविद्यालय, धुळेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सी. डी. देवकर यांनी उपस्थित शेतकरी आणि महिला बचत गटांना कृषि स्टार्टप्स विषयी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांचे हस्ते प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या ८७ प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यावेळी मंचावर कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल देसले उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री. जगदीश काथेपुरी यांनी केले. तांत्रिक सत्रामध्ये श्री. रोहित कडू यांनी उपस्थितांना PMFME योजनेतील उद्योजकता विकास कार्यक्रमाबाबत तसेच प्रकल्प अहवाल तयार करणे बाबत विस्तृत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. अमृता राऊत आणि डॉ. पंकज पाटील तसेच श्री. स्वप्निल महाजन, श्री. जयराम गावित, सौ. स्वप्निल कौटे, श्री. बाळू वाघ, श्री. कुमार भोये, श्री. मधुसूदन अहिरे यांनी विशेष सहकार्य लाभले.

## पाडेगाव येथे शेतकरी शास्त्रज्ञ मंच बैठकीचे आयोजन



**दि. १० ऑक्टोबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाअंतर्गत मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथे शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे बैठक पार पडली. या बैठकीच्या सुरूवातीला मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथील ऊस विशेषज्ञ डॉ. भरत रासकर यांनी गेल्या दोन वर्षात ऊसामध्ये पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांचा सत्कार केला. यामध्ये श्री. कल्याण काटे, श्री. विकास चव्हाण, श्री. सोमनाथ हुलगे, श्री. सौरभ कोकीळ, श्री. गिरीष बनकर या प्रगतशील ऊस शेतकऱ्यांचा समावेश होता. या प्रसंगी ऊस विशेषज्ञ यांनी या संशोधन केंद्राने गेल्या ५ वर्षामध्ये केलेल्या प्रगतीची माहिती सर्वांना दिली. बैठकीत शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष श्री. कल्याण काटे यांनी मंच स्थापनेची संकल्पना विषद केली. बारामती येथील जैविक ताण व्यवस्थापन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. अर्जुन तायडे यांनी कोईम्बतूर येथील नवीन तंत्रज्ञानावर व्याख्यान सादर केले. त्याचप्रमाणे एकरी १०० टन ऊस उत्पादनावर डॉ. भरत रासकर यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. सुरज नलावडे यांनी किड व रोगासंदर्भात शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. शिवार फेरीमध्ये डॉ. रामदास गारकर यांनी उसाचे जुने आणि नवीन वाण यांची प्रक्षेत्रावर माहिती दिली व शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले. डॉ. राजेंद्र भिलारे, कृषिविद्यावेत्ता आणि डॉ. दत्तात्रय थोरवे यांनी ऊसाचे बिजोत्पादन प्लॉटच्या ठिकाणी शेतकऱ्यांना बिजोत्पादनाचे महत्व पटवून दिले. डॉ. दिपक डामसे आणि

डॉ. सुभाष घोडके यांनी अजैविक ताण व्यवस्थापन व खोडवा व्यवस्थापनावर माहिती दिली. कार्यक्रमाचे नियोजन व संचालन जिल्हा विस्तार केंद्राचे प्रमुख डॉ. किरणकुमार ओंबासे यांनी केले. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी पुढील बैठक श्री. सौरभ कोकीळ, रा. धामनेर, ता. कोरेगाव, जि. सातारा येथे घेण्याचे ठरविण्यात आले.

## तुरीवरील वांझ रोगाच्या नियंत्रणासाठी शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन




**दि. ३ ऑक्टोबर, २०२२.** वांझ रोगास प्रतिकारकक्षम वाणांची लागवड करुन लागवडीनंतर जर २० व ४० दिवसांनी शिफारास केलेल्या कोळीनाशकांची फवारणी केली, तसेच वांझ रोगाचा प्रादुर्भाव झालेले वांझ रोगग्रस्त झाड दिसताच मुळासह उपटून त्वरीत नष्ट केले तर आपण तुरीवरील वांझ रोगाचे नियंत्रण सहज करु शकतो असे प्रतिपादन कडधान्य सुधार प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार कुटे यांनी केले. कडधान्य सुधार प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ व त्यांच्या चमुने शेतीदिन, शास्त्रज्ञ भेट आणि माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी या उपक्रमांतर्गत संपुर्ण एक दिवस शेतकऱ्यांसोबत व्यतीत करण्यासाठी मांदळी, ता. कर्जत येथे शेतकरी मेळावा व चर्चासत्राचे आयेजन करण्यात आलेले होते त्यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. नंदकुमार कुटे बोलत होते. याप्रसंगी किटकशास्त्रज्ञ डॉ. चांगदेव वायळ, रोगशास्त्रज्ञ डॉ. विश्वास चव्हाण, मांदळी गावच्या सरपंच सौ. शामली वाघ, मंडळ कृषि अधिकारी श्री. आर. एस. राउत व फार्मर प्रोड्युसर कंपनीचे श्री. शरद मेहेत्रे उपस्थित होते.

## जाधववाडी येथील संशोधन केंद्रावर शेतकरी शास्त्रज्ञ मंचाची बैठक




**दि. ७ ऑक्टोबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित अंजीर

सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी, ता. पुरंदर, जि. पुणे येथील संशोधन केंद्राचा शेतकरी शास्त्रज्ञ मंच स्थापन केला असून मंचाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मंचाचे अध्यक्ष श्री. देवराम काळे आणि इतर सदस्य यांच्या उपस्थितीत सदर बैठक संपन्न झाली. बैठकीदरम्यान अंजीर आणि सीताफळ बागांच्या सद्य परिस्थितीबाबत सविस्तर चर्चा झाली. संशोधन केंद्र प्रमुख डॉ. प्रदीप दळवे यांनी अंजीर आणि सिताफळ पिकातील बहार व्यवस्थापन तर डॉ. युवराज बालगुडे, वनस्पती रोगशास्त्रज्ञ यांनी हवामानातील बदलामुळे उद्भवणाऱ्या समस्या आणि एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. यावेळी शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष व प्रगतीशील शेतकरी श्री. देवराम काळे आणि मंचाचे सदस्य उपस्थित होते. बैठकीच्या समारोपानंतर जाधववाडी येथील प्रगतीशील शेतकरी श्री. सुनील जाधव यांच्या अंजीर बागेस भेट देऊन पाहणी करण्यात आली. शेतकरी शास्त्रज्ञ मंचाची बैठक यशस्वीरीत्या संपन्न होणेकरीता श्री. सुनील नाळे, श्री. नितीश घोडके, श्री. संदीप लिंभोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जाधववाडी येथे अंजीर व सिताफळ व्यवस्थापन प्रशिक्षणाचे आयोजन



**दि. १४ ऑक्टोबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित अंजीर सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी, ता. पुरंदर, जि. पुणे येथे उपविभागीय कृषि अधिकारी, फलटण व वाई यांच्या उपविभागातील शेतकऱ्यांकरिता एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान २०२२–२३ अंतर्गत प्रत्यक्ष शेतावरील प्रशिक्षण कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. यावेळी संशोधन केंद्र प्रमुख डॉ. प्रदीप दळवे यांनी अंजीर आणि सिताफळ लागवड तंत्रज्ञान, बहार व्यवस्थापन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. युवराज बालगुडे, वनस्पती रोगशास्त्रज्ञ यांनी अंजीर आणि सिताफळ पिकातील एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. प्रशिक्षणाच्या समारोपानंतर शिवार फेरी घेण्यात आली. सदर प्रशिक्षण यशस्वी होणेकरीता श्री. सुनील नाळे, श्री. नितीश घोडके, श्री. संदीप लिंभोरे व श्री. गणेश ढवळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## लोणावळा येथील कृषि संशोधन केंद्रात भात किड रोगविषयी प्रशिक्षण संपन्न



**दि. १२ ऑक्टोबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या लोणावळा येथील कृषि संशोधन केंद्रात मांढर, ता. पुरंदर, जि. पुणे येथील भात शेती गटातील महिला शेतकरी व शेतकरी यांच्यासाठी भात पिकावरील किड व रोग नियंत्रणाबाबत प्रशिक्षण व प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लोणावळा कृषि संशोधन केंद्राचे भात रोग शास्त्रज्ञ डॉ. किरण रघुवंशी यांनी भात पिकावरील रोग व किडीच्या व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी मांढर येथील पाणी फाउंडेशनचे मयुर साळुंके व भात शेती गटाचे सदस्य व केंद्राचे कृषि सहाय्यक संतोष आव्हाड उपस्थित होते. श्री. तानाजी शिर्के यांनी आभार मानले.

## नोव्हेंबर महिन्यातील कामांचा तपशील

### भुईमूग (उन्हाळी)

- भुईमूग लागवडीसाठी मध्यम खोल, उत्तम निचऱ्याची जमीन निवडावी.
- खरीप हंगामातील पीक निघाल्यानंतर जमिनीची खोल नांगरट करावी. त्यानंतर तीन ते चार कुळवण्याकरून ढेकळे फोडून जमीन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणीपूर्वी हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत अगर कंपोस्ट खत पसरावे.

### बागायती कापूस

- पिकातील २० ते ३० टक्के बोंडे फुटल्यानंतर पहिली वेचणी करून घ्यावी. त्यानंतर १५ ते २० दिवसांच्या अंतराने अनुक्रमे दुसरी व तिसरी वेचणी करावी.
- कापूस वेचणी आटोपल्यानंतर सर्व पऱ्हाट्या उपटून शेताबाहेर न्याव्यात व त्याचा कंपोस्ट खत तयार करण्यासाठी वापर करावा. जेणेकरून किडींच्या अवस्था नष्ट होतील.

### ऊस

- आडसाली उसाला साडे चार महिने झाले असल्यास मोठी बांधणीची कामे करावीत. बांधणीचे वेळी प्रति हेक्टरी १६० किलो नत्र (३४७ किलो युरिया), ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) व ८५ किलो पालाश (१४२

वर्ष :२, अंक क्रं. : २२, ऑक्टोबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

किलो म्युरेट ऑफ पोटॅश) ही रासायनिक खतांची मात्रा द्यावी तर को ८६०३२ जातीसाठी प्रति हेक्टरी २०० किलो नत्र (४३४ किलो युरिया), १०० किलो स्फुरद (६२५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) व १०० किलो पालाश (१६६ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) अशी रासायनिक खतांची मात्रा द्यावी.

- लोकरी मावाग्रस्त उसावर मित्रकीटक असल्यास रासायनिक कीटकनाशकांचा वापर करू नये. लोकरी माव्यासाठी डिफा ॲफिडीव्हरा, मायक्रोमस यासारख्या मित्र किटकांचे संवर्धन करावे. तसेच उसासाठी शिफारशीत रासायनिक खतांचा संतुलीत वापर करावा व ऊस पिकास जास्त पाणी देवू नये.
- ठिबक सिंचनाची सोय असल्यास पाण्याबरोबर प्रती एकरी १२.५ किलो युरीया, ४.५ किलो युरीया फॉस्फेट व १३ किलो म्युरेट ऑफ पोटॅश या विद्राव्य खतांची मात्रा दर आठवडयातून एकदा द्यावी.
- पूर्वहंगामी उसाची लागवडीची कामे नोव्हेंबर अखेरपर्यंत पूर्ण करावीत., कोएम ०२६५, को ८६०३२, कोसी ६७१, फुले १०००१, व्ही.एस.आय.४३४ व को. व्ही.एस.आय.९८०५ या जातींची लागवडीसाठी निवड करावी.
- पाणी बचत होण्याच्या दृष्टीने मध्यम जमिनीसाठी ७५–१५० सें व भारी जमिनीसाठी ९०–१८० सेंमी. पट्टा पध्दतीचा वापर करावा. सलग पद्धतीने लागवडीसाठी मध्यम जमिनीत १०० सें.मी. ते १२० सें.मी. तर भारी जमिनीमध्ये १२० ते १५० सें.मी. दोन सऱ्यातील अंतर ठेवावे. पाण्याच्या बचतीसाठी ठिबक सिंचनाचा वापर करावा.
- लागणीपूर्वी बेण्यास ३०० मिली. मॅलॅथिऑन अथवा २६५ मिली डाय मेथोएट व १०० ग्रॅ बावीस्टीन १०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात बेणे १० मिनीटे बुड्बुन बेणे प्रक्रिया करावी. या बिजप्रक्रियेनंतर प्रति हेक्टरी १० किलो ॲसेटोबॅक्टर अथवा १ लिटर द्रवरूप ॲसेटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जीवाणू १.२५ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात कांडया ३० मिनीटे बुडवाव्यात.
- लागणीच्या वेळी प्रति हेक्टरी ४० किलो नत्र (८७ किलो युरिया) को.८६०३२ जातीसाठी व इतर सर्व जातींसाठी ३४ किलो नत्र (७४ किलो युरिया) तसेच ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ८५ किलो पालाश (१४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) ही रासायनिक खते सरीमध्ये द्यावीत.
- पूर्वहंगामी उसात आंतरपिक म्हणून बटाटा, पानकोबी, फुलकोबी, वाटाणा व कांदा, यासारख्या भाजीपाला पिकांचा समावेश करावा.
- लागणीनंतर वापसा येताच हेक्टरी ५ किलो ॲट्राटाप किंवा मेट्रीब्यूझीन १.५ किलो १००० लिटर पाण्यात मिसळून जमिनीवरील तणावर फवारावे. जमिन तुडवली जाणार नाही याची काळजी घ्यावी.
- माती परीक्षणाच्या आधारे सुक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास हेक्टरी २५ किलो फेरस सल्फेट २० किलो झिंक सल्फेट १० किलो मॅगेनीज सल्फेट आणि ५ किलो बोरॅक्स हि सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त सुक्ष्म खते चांगल्या कुजलेल्या शेणखतात १०:१ प्रमाणात मिसळून ४ ते ५ दिवस सावलीत मुरवून शेतात चळी घेवून द्यावीत.
- ठिबक सिंचनाची सोय असल्यास पाण्यातून प्रति एकरी नऊ किलो युरिया, दोन किलो युरिया फॉस्फेट व सहा किलो म्युरेट ऑफ पोटॅश या विद्राव्य खतांची मात्रा दर आठवडयातून एकदा द्यावी.

### हरभरा व्यवस्थापन

- पेरणीनंतर २० दिवसांनी पहिली व ३० दिवसांनी दुसरी कोळपणी करावी.
- कोळपणीनंतर दोन रोपातील तण काढण्यासाठी खुरपणी करावी.
- घाटेआळीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची पहिली फवारणी करावी.

### तूर

- कमी कालावधीच्या पीक वाणांची पक्वतेनुसार काढणी व मळणी करावी.

### नाचणी

- काढणीचा हंगाम : नोव्हेंबर – डिसेंबर
- पक्वतेची लक्षणे – पाने वाळतात, दाण्याचा रंग पिवळसर तपकिरी होवून कणसे तांबूस होतात.
- काढणीची पद्धत : कणसे खुडणे किंवा जमिनीबरोबर कापणी करणे.
- मळणी : कणसे बडवणे/बैलाने मळणी करणे/मळणी मशीन
- मळणीची वेळ : डिसेंबर– जानेवारी

### रब्बी ज्वारी

- गरजेप्रमाणे दुसरी खुरपणी करावी व पेरणीनंतर ८ आठवड्यांनी दातेरे कोळप्याने तिसरी कोळपणी करून गरज असल्यास दुसरे संरक्षित पाणी द्यावे.

### गहू

- कमी पाण्यावर येणाऱ्या गव्हाची पेरणी नोव्हेंबरच्या १० तारखेपर्यंत करावी.
- कमी पाण्यावर येणाऱ्या गव्हाच्या पेरणीसाठी नेत्रावती, डि.बी.डब्लु.९३ व फुले सात्विक या सुधारीत वाणांचा वापर करावा.
- कमी पाण्यावर येणाऱ्या गव्हाच्या पेरणीसाठी प्रती हेक्टर ७५ ते १०० किलो बियाणांचा वापर करावा.
- बागायती गव्हासाठी पाण्याचा चांगला निचरा होणारी, भारी व खोल जमिनीची निवड करावी. तथापि, मध्यम जमिनीत भरखते व रासायनिक खतांचा योग्य वापर केल्यास उत्पादन चांगले घेता येईल.
- गव्हाच्या लागवडीपुर्वी खरीपाचे पीक निघाल्यानंतर १५ ते २० से.मी. खोलीवर नांगरट करावी.
- कुळवाच्या तीन ते चार पाळ्या द्याव्यात. खरीपामध्ये शेणखत दिले नसल्यास हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीमध्ये मिसळावे.
- गव्हाची बागायती वेळेवर पेरणी नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवाडयात करावी.
- वेळेवर पेरणीसाठी फुले समाधान, त्र्यंबक, तपोवन, एमएसीएस ६२२२, एमएसीएस ६४७८, डि.बी. डब्ल्यू. १६८ या सुधारीत वाणांचा वापर करावा.
- पेरणीपुर्वी प्रती किलो गहू बियाण्यास ३ ग्रॅम थायरमची बीजप्रक्रिया करावी. त्यानंतर प्रत्येकी २५० ग्रॅम अझोटोबॅक्टर आणि पीएसबी प्रति १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड पाण्यात मिसळून चोळावे. असे बीजप्रक्रिया केलेले बियाणे तासभर सावलीत सुकवावे आणि मग पेरणी करावी.
- बागायती वेळेवर पेरणी करतांना दोन ओळीत २० से.मी. अंतर ठेवून करावी. पेरणीसाठी दर हेक्टरी १०० किलो बियाणे वापरावे.
- बागायती वेळेवर पेरलेल्या गहू पिकास पेरताना प्रती हेक्टरी ६० किलो नत्र, ६० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश दयावे. पेरणीनंतर २१ दिवसांनी हेक्टरी ६० किलो नत्राचा दुसरा हफ्ता दयावा.

### माती परिक्षणाद्वारे खत व्यवस्थापन

- नत्र (कि./हे ) = (७.४२ X अपेक्षित उत्पादन क्विं./हे.) – (०.८८ X जमिनीतील उपलब्ध नत्र कि./हे.) –(२.४५ X उपलब्ध शेणखत टन /हे.)
- स्फुरद (कि./हे ) = (१.७९ द अपेक्षित उत्पादन क्विं./हे.) –(१.४७ X जमिनीतील उपलब्ध स्फुरद कि./हे.) – (०.३३ X उपलब्ध शेणखत टन /हे.)
- पालाश (कि./हे ) = (४.७७ X अपेक्षित उत्पादन क्विं./हे.) – (०.४७ X जमिनीतील उपलब्ध पालाश कि./हे.) – (०.६५ द उपलब्ध शेणखत टन /हे.)
- लोहाची कमतरता असणाऱ्या जमिनीमध्ये गव्हाचे अधिक उत्पादन, आर्थिक फायदा व जमिनीतील लोहाची पातळी राखण्यासाठी शिफारशित अन्न द्रव्यासोबत (१२०:६०:४० नत्र:स्फुरद:पालाश किलो प्रति हेक्टर अधिक १० टन शेणखत प्रती हेक्टरी), मुरविलेले हिराकस २० किलो प्रती हेक्टरी) १०० किलो शेणखतात १५ दिवस मुरवुन जमिनीतून द्यावे.
- मावा किडीचा नियंत्रणासाठी थायोमिथोक्झाम ३० एफ. एस. ७.५ मिली प्रति १० किलो बियाणे प्रमाणे बीजप्रक्रिया करावी.
- विद्यापीठाने प्रसारीत केलेल्या तांबेरा रोग प्रतिकारक्षम वाणांचीच पेरणीसाठी निवड करावी. गव्हाची पेरणी वेळेवर करावी व नत्र खताचा पहिला हप्ता शिफारशीत मात्रेनुसारच द्यावा.

### आले

- हिवाळयात १२ ते १५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. पानावरील ठिपके रोगापासून आले पिकाचा बचाव करावा या रोगाची सुरुवात कोवळया पानावर होऊन नंतर तो सर्व पानावर पसरतो या रासेगामध्ये असंख्य लहान गोलाकार ठिपके तयार होतात. रागाची तीव्रता वाढत गेल्यास हे ठिपके एकत्र येवून संपूर्ण पान करपते. नियंत्रणासाठी डायथेन एम ४५, १० लिटर पाण्यात २५ ते ३० ग्रॅम किंवा बाविस्टीन १० लिटर पाण्यात १० ते १५ ग्रॅम किंवा १ टक्के बोर्डोमिश्रण तयार करून फवारणी करावी. हवामानाच्या परिस्थितीनुसार सप्टेंबर ते नोव्हेंबर या कालावधीत १५ ते २० दिवसाच्या अंतराने फवारण्या कराव्यात. वरील औषधांचे आलटून–पालटून फवारण्या कराव्यात. कच औषध सतत फवारणीसाठी वापरू नये.

### भाजीपाला पिके

- खरीप कांदा लागवडीचे पाणी तोडावे.
- रागंडा कांदा लागवडीस नत्र खताचा पहिला हप्ता द्यावा.
- वाटाणा पिकाचे लागवडीचे काम पूर्ण करावे.
- लसूण पिकाचे लागवडीचे काम पूर्ण करावे.
- रबी कांदा रोपवाटीकेची काळजी घ्यावी.
- फ्लॉवर, कोबी व टोमॅटो रोपांची काळजी घ्यावी.
- खरीप हंगामातील वांगी, मिरची, टोमॅटो, भेंडी, गवार वेलवर्गीय भाजीपाला पिकांची तोडणी करावी.
- किड व रोग नियंत्रणाचे उपाय वेळीच करावे.
- रबी हंगामात येणाऱ्या गाजर, बीट, मुळा पीकाचे व्यवस्थापन करावे.

- रबी हंगामातील टोमॅटो पिकाची लागवड शेवटच्या आठवड्यात करावी.
- खरीप कांदा पिकाची काढणी करावी.
- कांदा काढणी करून ३ ते ५ दिवस शेतात सुकवावा. २.५ ते ३.० सें.मी. पात ठेवून कांदा कापणी करावी.

**पशुसंवर्धन**

- दुध उत्पादनानुसार पशुखाद्य व आहारात योग्य तो बदल करावा.
- नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवडयात लाळखुरकत, फऱ्या व घटसर्प या रोगांची एकत्रित रोगप्रतिबंध लस टोचून घ्यावी.
- जनावरांचे थंडीपासून संरक्षण करावे.

**प्रकाशक** : **डॉ. तानाजी नरुटे**
संचालक, विस्तार शिक्षण

**प्रमुख संपादक** : **डॉ. पंडित खर्डे**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र

**सहसंपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
**श्री. सुनिल राजमाने**
कृषि सहाय्यक, प्रसारण केंद्र

**डिझाईनर** : **श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २४९७/२०२२**